# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**शीतल तेली–उगले,** भा.प्र.से
**महानगर आयुक्त**

**स्टेशन रोड, सदर, नागपूर** – 440 001
**फोन : (०७१२) २५३३२०२ (कार्यालय)**
**ई–मेल :** mcmetrongp @gmail.com

---

क्रमांक : नामप्रविप्रा बै./२७५

नागपूर, दिनांक ०५/०७/२०१९

प्रति,

मा. प्रधान सचिव,
मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय,
मंत्रालय, मुंबई–३२.

**विषय :–** <u>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</u>
**दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्याबाबत.**

महोदय,

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पाचवी बैठक मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात आले असून, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.

सहपत्र : द्विप्रतीत कार्यवृत्त

05·07·19

(शीतल तेली–उगले)
सदस्य सचिव तथा महानगर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास
प्राधिकरण

का. प्र.

8/7/19

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

गुरूवार, दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त.

**उक्त बैठकीला खालील प्रमाणे पदाधिकारी/अधिकारी उपस्थित होते.**

१) **मा. ना. श्री देवेन्द्र फडणवीस,**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

२) **मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे,**
ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा व
सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

३) **मा. श्री योगेश सागर,**
राज्यमंत्री, नगर विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य तथा सदस्य,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

४) **मा. श्रीमती नंदा जिचकार,**
महापौर, नागपूर महानगरपालिका तथा
सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

५) **मा. श्री मिलींद माने,**
विधानसभा सदस्य, उत्तर नागपूर विधान सभा क्षेत्र

६) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

७) **मा. श्री संजीव कुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृह निर्माण विभाग, महाराष्ट्र शासन

८) **मा. श्री नितीन करीर, भाप्रसे,**
प्रधान सचिव, नगर विकास विभाग–१,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा सदस्य,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

९) **मा. श्रीमती मनिषा म्हैसकर, भाप्रसे,**
प्रधान सचिव, नगर विकास विभाग–२,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

१०) **मा. श्री संजीव कुमार, भाप्रसे**
विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर तथा सदस्य,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

११) **मा. श्री अभिजीत बांगर, भाप्रसे**
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर तथा सदस्य,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

१२) **श्रीमती शीतल तेली–उगले, भाप्रसे,**
महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

१३) **श्री हेमंतकुमार पवार,**
अपर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

१४) **श्री हेमंत ठाकरे**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

१५) **श्री सतीश सुशीर**
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नागपूर

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या गुरूवार, दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीचे इतिवृत्त

सर्वप्रथम, मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे व इतर सर्व उपस्थीत सन्माननीय सदस्यांचे महानगर आयुक्त, तथा सदस्य सचिव, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी स्वागत करून मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने बैठकीला सुरूवात करण्यात आली.

| अ. क्र. | ठराव क्रमांक | विषय | ठराव / निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या चौथ्या बैठकीतील निर्णय तथा सुचनांचा अनुपालन अहवाल. | दिनांक ०१.१.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या समिताचा अहवाल व प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र दिनांक १६.०४.२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.<br>चर्चेअंती मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदीनुसार प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१) यांनी महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना उचित निर्देश द्यावेत, असे मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देशित केले.<br>विषय क्र. १ यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | नगर विकास विभाग (१) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ०२/०५/०४.७.२०१९ | बुधवार, दि. १६ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या पाचव्या बैठकीतील निर्णय प्राधिकरणासमोर माहिती व अनुमोदनाकरीता ठेवण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ३ | ०३/०५/०४.७.२०१९ | शनिवार, दि. ४ मे, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीतील निर्णय प्राधिकरणा समोर माहिती व अनुमोदना करीता सादर. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ४ | ०४/०५/०४.७.२०१९ | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ च्या कलम २८ अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २०१८–२०१९ चे सुधारीत व सन २०१९–२०२० चे अनुमानित अंदाजपत्रक सादर करण्याबाबत. | अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ५ | ०५/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे दि. ०१ एप्रिल, २०१९ ते ३० जून, २०१९ पर्यंतचे अंतरिम अर्थसंकल्पास कार्योत्तर मंजुरी प्रदान करणेबाबत. | अंतरिम अर्थसंकल्पास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ०६/०५/०४.७.२०१९ | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांकरीता (EWS) मंजूर असलेल्या प्रकल्पास शासनाचा निधी व लाभार्थ्यांकडून प्राप्त होणा--या निधी पूर्वी झालेल्या खर्चाचे देयक नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा द्वारे अदा करणे व निधी प्राप्त झाल्यानंतर समायोजित करण्याबाबत. | प्राधिकरणाचा ठराव क्र.७/०२/२६.०३.२०१८ अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून देयके प्रदान करण्यास मंजूर केलेली रक्कम रू. २५.०० कोटी ही मर्यादा वाढवून ती रू. १००.०० कोटी एवढी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ७ | ०७/०५/०४.७.२०१९ | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांची ऑनलाईन सोडतीद्वारे विक्री करून घरकुले वाटप करण्याकरीता आरक्षण धोरण ठरविण्याबाबत. | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत (घटक ३) बांधण्यात आलेल्या ४३४५ घरकुलांची ऑन लाईन सोडतीव्दारे विक्री करून वाटप करण्याकरीता अनुसुचित जाती ११ टक्के, अनुसुचित जमाती ६ टक्के, दिव्यांग (अपंग) ५ टक्के, नागपूर सुधार प्रन्यास कर्मचारी ५ टक्के आणि शासकीय/ निमशासकीय कर्मचारी ५ टक्के अशी एकूण ५ आरक्षणे ठेवण्यास मान्यता प्रदान करण्यात आली तथापि, उपरोक्त आरक्षित घटकातील घरकुले आवंठीत न झाल्यास ही घरकुले सर्वसाधारण गटात सोडतीव्दारे वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ८ | ०८/०५/०४.७.२०१९ | फुटाळा तलाव येथे संगीत कारंजे, लाईट साऊंड व लेझर मल्टीमिडिया शो तसेच अंबाझरी उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारीत | प्रस्तावित केल्याप्रमाणे फुटाळा तलाव येथील रंगीत कारंजे, लाईट साऊंड व लेझर मल्टीमिडीया शो तसेच अंबाझरी उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारीत लाईट, साऊंड व लेझर मल्टीमिडीया शो | १.नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | लाईट, साऊंड व लेझर मल्टीमिडीया शो उभारण्याबाबत. | उभारण्याच्या प्रकल्पास रू. ९९.१८ कोटी एवढ्या प्रस्तावित खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.<br>प्रकल्पासाठी आवश्यक अंबाझरी येथील जमीन अद्याप नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला मिळालेली नाही. नागपूर महानगरपालिकेने वर्कींग परमिशन द्यावी. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आवश्यक असलेली जागा हस्तांतरणाची कार्यवाही तातडीने करावी, असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी आयुक्त, महानगर पालिका, नागपूर यांना निर्देश दिले.<br>सदर प्रकल्पाचे पाच वर्षाचे व्यवस्थापन, कार्यान्वयन, संचालन, देखभाल व दुरूस्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रकल्प नागपूर महानगर पालिका यांना आर्थिक दायित्वासह कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. | २.नागपूर महानगर पालिका |
| ९ | ०९/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन विल्हेवाट विनियम (Land Disposal Regulation), २०१९ प्रारूप प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. | प्रस्तावित नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियम (Land Disposal Regulation), २०१९ ला सुधारणेसह मान्यता प्रदान करतांना मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांनी खालील प्रमाणे बदल सुचविले आहेत.<br>१. विनियमाच्या नियम १८ मध्ये नमूद केलेले ''ट्रॉमा सेंटर'' हे वगळण्यात यावे.<br>२. विनियमाच्या नियम १८ (१) (अ) नुसार भूखंड मागणीसाठी प्राप्त अर्जांचा विचार करतांना मागणी केलेली जमीन ही जर मागणी करणा—या | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संस्थेच्याच सुधार योजनेतील मुळ मालकाची असेल तर अशा अर्जदार संस्थेस वार्षीक मुल्य दर तक्त्यातील (ASR) दराच्या २५ टक्के एवढे शुल्क आकारून जमीन देण्यात यावी.<br>परंतू, अशी जमीन वाटप करतांना या तरतुदी अंतर्गत वाटप होणा—या भूखंडाचे क्षेत्रफळ मुळ जमीन मालक संस्थेच्या सुधार योजनेतील एकूण क्षेत्राच्या ४०टक्के पेक्षा अधिक होणार नाही.<br>३. नियम १८ (१) (ब) नुसार वरील नियम १८ (१) (अ) मध्ये समाविष्ठ नसणा—या प्रकरणात जमीन वाटप करतांना हा दर वार्षीक मुल्य दर तक्त्यातील (ASR) दराच्या ५० टक्के एवढा असेल.<br>४. अर्जदार संस्था यांना जमीन उपलब्ध करून देण्याचे अधिकार प्राधिकरणाचे असतील व प्राधिकरणाचा निर्णय अंतीम असेल. | |
| १० | १०/०५/०४.७.२०१९ | मा. मुख्यमंत्री महोदयाचे मंजुरीने नामप्रविप्राचा लोगो निश्चित करण्याबाबत. | जे.जे स्कुल ऑफ आर्ट्स , मुंबई यांचेकडून तयार करून घेण्यात आलेल्या विविध लोगोंचे सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणाअंती दोन लोगो बाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी काही किरकोळ बदल सूचवून त्यात नारंगी रंग असावा, असे सुचित केले. त्यानुसार दोन लोगो प्रस्तावित करण्यात आले असून ते सोबत जोडले आहेत.. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या पसंतीनुसार लोगो निश्चीत करण्यात यईल. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | ११/०५/०४.७.२०१९ | शासन, नगर विकास विभाग, पत्र क्र. एनआरडी–३३१९/प्र.क्र.०२/नवि–७, दि. २२ मार्च, २०१९ अन्वये प्राप्त निर्देशाप्रमाणे आवश्यक पदांबाबतचा प्रस्ताव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गिकरण) नियम, २०१९ मान्यतेसाठी सादर करणेबाबत. | प्रस्तावित केल्याप्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाच्या किमान व तातडीच्या आवश्यक १५६ अधिकारी/कर्मचा–यांच्या पदसंख्येस व सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. ही पदे भरण्यासाठी महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.<br>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सेवा सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ यास प्राधिकरणाने मान्यता प्रदान केली व सदर नियम मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात यावेत, असे निर्देशित केले. | १.नगर विकास विभाग (१)<br><br>२.नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| १२ | १२/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर या संस्थेच्या कार्यकारी समितीवर सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत. | शासन पत्र दिनांक २७.५.२०१९, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ मार्च, २०१९ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, २०१६ च्या कलम ७ नुसार विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ६ व्यक्तींना नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीत अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित करावयाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि, अशासकीय संघटनेच्या आणि समुदाय आधारित संघटनेच्या मान्यतेसाठीची मानके, सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठीची आवश्यक अर्हता आणि त्यांना ज्या रीतीने नामनिर्देशित करावयाचे आहे ती रीत, राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल, या अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. | १.नगर विकास विभाग (१)<br><br>२. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | १३/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते) प्रारूप विनियम, २०१९ शासनाच्या मान्यते करीता सादर करण्याबाबत. | प्रस्तावित नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते) विनियम, २०१९ च्या प्रारूपास मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि, अशासकीय सदस्यांना बैठक भत्त्यासोबत कार्यकारी समितीची मुंबईत बैठक आयोजित करण्यात आल्यास प्रवास भत्ता देण्यात यावा, असेही मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देशित केले. त्यानुसार राज्य शासकीय वर्ग–१ च्या अधिका–यांना अनुज्ञेय असल्याप्रमाणे अशासकीय सदस्यांना रेल्वे A.C-2 Tier अन्वये प्रवासभत्ता अनुज्ञेय करण्यात येईल व या बाबीचा प्रस्तावित नियमात अंतर्भाव करून सदर नियम शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येतील, असे ठरले. | १. नगर विकास विभाग (१)<br><br>२. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| १४ | १४/०५/०४.७.२०१९ | प्रधानमंत्री आवास योजना घटक ४ अंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांकडून प्रशासकीय खर्चासाठी शुल्क आकारण्याबाबत. | प्रस्ताव अमान्य करण्यात आला. तथापि, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या धर्तीवर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बाह्यस्थ संस्थेमार्फत आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे व त्यासाठी लागणा–या खर्चासाठी आवश्यक निधी गृहनिर्माण विभागाने उपलब्ध करून द्यावा, असे ठरले. | १. गृह निर्माण विभाग<br><br>२.नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| वेळेवर येणारे विषय | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | ठराव क्रमांक | विषय | ठराव / निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग |
| | १५/०५/०४.७.२०१९ | १. नॅशनल कॅन्सर इन्स्टीट्युट या सेवाभावी संस्थेला जागा देण्याबाबत. | डॉ. आबाजी थत्ते नॅशनल कॅन्सर इन्स्टीट्यूट यांनी सुधार योजनेत दिलेली ४० टक्के जमिन परत मिळण्याबाबत अर्ज सादर केला आहे.<br><br>डॉ. आबाजी थत्ते नॅशनल कॅन्सर इन्स्टीट्यूट यांनी मागणी केलेल्या जागेसंदर्भात प्राधिकरणाच्या सदर बैठकीत मान्य करण्यात आलेल्यां विषय क्रमांक ९ नुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| १६ | १६/०५/०४.७.२०१९ | नागपूर पेरी अर्बन (१० गांवे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या शासनाने मंजूर केलेल्या दोन सुधार योजनांना पाणी पुरविण्याकरीता राखीव कोटयातून नागपूर/कामठी तहसिलमधील नागपूर शहरालगत तरोडी (खु.), वेळाहरी, गोटाळपांजरी, तरोडी (बु.) व कापसी (बु.) या गावांचा समावेश करून त्याकरीता लागणारे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमीत करण्याबाबत. | या संदर्भात बैठकीत चर्चा झाली असता, बैठकीत उपस्थित श्री. सतीश सुशीर, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या राखीव कोट्यातून तरोडी (खुर्द), वेळाहरी, गोटाळपांजरी, तरोडी (बु) व कापसी (बु) या गावांना आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगून, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, असे स्पष्ट कले. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | १७/०५/०४.७.२०१९ | प्रधानमंत्री आवास योजना घटक ३ अंतर्गत मौजा भिलगांव, ता.कामठी, येथील ख.क्र. १४६/३, १४६/४, १४६/५, १४६ ते १४१/१ या एकूण १.०६ हे.आर जागेवर घरकुल बांधणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. या योजने अंतर्गत केवळ मौजा भिलगांव या ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरीक/ रहीवासी यांचेच अर्ज मागविण्यात यावेत व त्यातून पात्र लाभार्थ्यांची निवड करून अशा लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात यावा. तथापि, मौजा भिलगांव येथील पुरेसे व पात्र लाभार्थी उपलब्ध न झाल्यास अन्य लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत व सोडत पध्दतीने लभार्थ्यांची निवड करून त्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा, या प्रस्तावास शासन स्तरावरून मान्यता प्रदान व्हावी असे प्रस्तावित आहे. | या संदर्भात चर्चेअंती अपर मुख्य सचिव, गृह निर्माण विभाग यांना सदर विषयाबाबत शासन स्तरावर स्वतंत्र कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले. | गृह निर्माण विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | १८/०५/०४.७.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वित्तीय व्यवहारांना आयकरापासून सुट मिळावी यासाठी शासन स्तरावरून आवश्यक अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ व सिडको या सार्वजनिक उपक्रमांबाबत शासनाने अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्याच धर्तीवर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाबाबतही अधिसूचना प्रसिध्द व्हावी, असे प्रस्तावित आहे. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावित केल्याप्रमाणे आवश्यक अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही नगर विकास विभाग (१) यांनी करावी, असे मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांनी निर्देश दिले. | नगर विकास विभाग (१) |

मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सर्व उपस्थित मान्यवरांचे महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी आभार मानले व मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

(देवेन्द्र फडणवीस)
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

05.07.19
(शीतल तेली–उगले)
महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

पर्याय. १

NMRDA
नागपूर महानगर प्रदेश
विकास प्राधिकरण

पर्याय - २ ✓

NMRDA
नागपूर महानगर प्रदेश
विकास प्राधिकरण